# BBC LEARNING ENGLISH
# English Together
## Water shortage
*This is not a word-for-word transcript*

**Tejali**
नमस्कार मित्रांनो! Hello and welcome to English Together, असा शो जिथे आपण चर्चा करतो निरनिराळे विषय आणि त्यासंबंधित शब्दांची. मी तेजाली आणि माझ्यासोबत आहे टॉम

**Tom**
Hello to our audience, I'm Tom, Welcome to today's episode and I'm here with…

**Phil**
Hi I'm Phil! Welcome.

**Tom**
Thank you Phil. So, Phil, I don't know about you, but I am absolutely boiling here in the studio today!

**Phil**
Oh! Me too!

**Tom**
Yeah. It's really hot.

**Tejali**
इथे तेवढं गरम होत नाहीये. पण हो, पाण्याची टंचाई मात्र आता जाणवू लागली आहे. **Boiling** म्हणजे उकळणे. अतिशय उकडत असेल ,गरम होत असेल तेव्हा Boiling हा शब्द वापरतात. हे extreme adjective आहे. अतिशय टोकाची परिस्थिती सांगणाऱ्या क्रियाविशेषणांना extreme adjective म्हणतात. यासोबत आपण 'absolutely' नक्कीच वापरू शकतो.

**Tom**
In the news recently there's been a lot of concern about water shortages in


© British Broadcasting Corporation 2018

Delhi and Cape Town. Is that an issue for you?

**Tejali**

**Water shortage** म्हणजे पाण्याची टंचाई. तुम्हाला आठवतंय, 2016 मध्ये लातूरला मिरजेहून रेल्वेने पाणी पाठवलं होतं. महाराष्ट्रात काही गावांत उन्हाळा सुरू झाला की पाण्याची टंचाई सुरू होते. आता परतीच्या पावसानेही ओढ दिली आहे, त्यामुळे आतापासूनच काही ठिकाणी पाण्याचा तुडटवडा जाणवू लागला आहे. आता पाण्याबद्दल बोलतोय तर प्रश्न आहे युएई मधल्या पाण्याच्या वापराबद्दल... युएइमध्ये पाण्याचा दरडोई सरासरी वापर किती आहे? तुम्हाला याबद्दल काही माहिती आहे का? Watercalculator.orgची आकडेवारी काय सांगते याबद्दल? तीन ऑप्शन्स आहेत:

a) 100 litres प्रति माणशी

b) 1000 litres

c) 10 000 litres.

याचं उत्तर मी तुम्हाला नंतर देईन

**Tom**

Well, that's certainly a lot more water than the residents of Shimla have been using. The Indian city has been experiencing extreme water shortages recently. Let's listen to today's news clip from BBC World Service's *World Business Report*. How is the water shortage affecting the local economy?

**Devina**

It's almost noon in the popular tourist city of Shimla. It is called the Queen of Hills but there has been a fifty-percent water shortage. Tourism is a main source of income here. Around thirty-thousand people visit Shimla every day from different parts of India to escape the summer heat and enjoy the green scenic hills. But this year hotels are finding it very difficult to provide water to their guests. Almost 60% of advanced bookings have already been cancelled.

**Phil**

Wow! That's such a shame. Not only are the people of Shimla short of water, they're also losing the business that tourism brings in!

**Tom**


© British Broadcasting Corporation 2018

And it sounds like it's a very popular place, too. The reporter said it was popular with people during hot spells.

**Tejali**

हा! **A hot spell** म्हणजे गर्मी, गर्मीचे दिवस. खूपच जास्त गरम होतं तेव्हा त्याला heatwave म्हणजे उष्णलहर म्हणतात.

**Phil**

I think increasingly hot temperatures just exacerbate the problem, really.

**Tejali**

**To exacerbate** म्हणजे परिस्थिती बिघडणे, परिस्थिती चिघळणे. मराठवाड्यात मुळात उन्हाळा जास्त आणि त्यात पाणी टंचाई म्हणजे परिस्थिती आणखी बिघडते. Can you explain more, Phil?

**Phil**

Well, take farming for example. Heatwaves can make the land dry, meaning we have to use more water for irrigation.

**Tejali**

Ah! **Irrigation** म्हणजे सिंचन किंवा पाणी पुरवठा. आपल्याकडे ठिबक सिंचन, तुषार सिंचन अशा सिंचनाच्या वेगवेगळ्या पद्धती वापरली जातात.

**Tom**

And, let's not forget that populations are increasing all the time, as well! Would you say there is an increase in demand for water in your country?

**Tejali**

An increase in demand म्हणजे मागणी वाढणे. उन्हाळा वाढला की पाण्याची मागणी वाढतेच आणि मग विजेचीही. सगळीकडे कूलर्स, एसी चालू होतात, मग जास्त वीज लागणारच!.

बरं पण आता तुम्हाला मी प्रश्नाचं उत्तर देते. मी विचारलेलं, युएइमध्ये पाण्याचा दरडोई सरासरी वापर किती आहे? आणि याचं उत्तर आहे 10329 लिटर पाणी. A


© British Broadcasting Corporation 2018

citizen of the UAE uses 10329 litres of water per day, on average. पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे भारतातला सरासरी दरडोई पाण्याचा वापर 500लिटरपेक्षाही कमी आहे.

**Tom**
Wow! There is a huge discrepancy between how much water people use around the world.

**Tejali**
ही तफावत कशामुळे? Discrepancy म्हणजे फरक,तफावत. Maybe we all need to think about how we will manage to share this water in future.

**Phil**
Definitely. I'm sure people everywhere can take steps to cut down on their water consumption.

**Tejali**
To cut down on म्हणजे कपात करणे. गाड्या रोज न धुणे, शॉवर ऐवजी बादलीत पाणी घेऊन अंघोळ करणे अशा छोट्या छोट्या गोष्टींनी पाणी वाचवता येऊ शकतं.

**Tom**
I do agree with what you're saying, but how can I cut down my water consumption in this heat?! It really does exacerbate everything! I'm going to get a drink and have a nice cold shower.

**Tejali**
Careful Tom! It's hot outside!
तुमच्याबद्दल सांगा, water shortage म्हणजे पाणी टंचाईचा तुम्हाला काय त्रास होतो? आता भाग संपवायची वेळ आली आहे, तर जाता जाता आजच्या शब्दांवर पुन्हा एक नजर टाकू. **Hot spells** म्हणजे गर्मीचे दिवस तर **heatwaves** म्हणजे उष्ण लहर. **Irrigation** म्हणजे सिंचनासाठीही बरंच पाणी लागतं. पाण्याच्या वापरामध्ये बरीच discrepancy म्हणजे तफावत आहे असं तुम्हाला वाटतं का? पाणीपुरवठा mismanaged आहे असं तुम्हाला वाटतं का? **mismanaged** म्हणजे चुकीचं व्यवस्थापन. आम्हाला नक्की सांगा, पुन्हा भेटू English Togetherच्या पुढच्या भागात.Bye!


© British Broadcasting Corporation 2018